आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र -संध्याकाळी ७.०० वाजता

१८ डिसेंबर २०२४ - बुधवार

**ठळक बातम्या**

- शहरी नक्षलवादाला आळा घालण्यासाठी महाराष्ट्र विशेष जनसुरक्षा विधेयक विधानसभेत सादर, संयुक्त चिकीत्सा समितीकडे पाठवण्याची सरकारची शिफारस

- विधानपरिषदेच्या सभापतीपदी महायुतीचे उमेदवार राम शिंदे यांची निवड होण्याचा मार्ग मोकळा

- परभणी आणि बीडमधल्या हिंसाचार प्रकरणी विधानसभेत चर्चा सुरू, नुकसान झालेल्यांना FIR शिवाय नुकसान भरपाई देण्याचे राज्य अनुसूचित जाती जमाती आयोगाचे आदेश

- ज्येष्ठ साहित्यिक समीक्षक सुधीर रसाळ यांना साहित्य अकादमीचा पुरस्कार जाहीर

**आणि**

- उरणजवळ प्रवासी बोटीला झालेल्या अपघातात ७ जणांचा मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती

**<><><><><>**

नक्षलवादाला आळा घालण्यासाठी, शहरी नक्षल अड्डे बंद करण्यासाठी 'महाराष्ट्र विशेष जनसुरक्षा विधेयक-2024' मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी विधानसभेत मांडले. संविधानावरचा विश्वास डळमळीत करण्यासाठी काही संस्था कार्यरत आहेत. अटकेतल्या नक्षलवाद्यांना सोडवण्यासाठी त्या शहरी भागात काम करतात. या संस्थांना आळा घालण्यासाठी हे विधेयक आणल्याचं मुख्यमंत्री म्हणाले. छत्तीसगड, ओडिशा, तेलंगणा, आंध्रप्रदेशातही अशाप्रकारचा कायदा आहे. राज्यातल्या नक्षल विरोधी पथकानं अशाप्रकारच्या कायद्याची मागणी केली होती.

त्यामुळंच हे विधेयक आणत असल्याचं त्यांनी सांगितलं. या विधेयकावर व्यापक चर्चा व्हावी यासाठी संयुक्त चिकीत्सा समितीकडे पाठवण्याची शिफारस त्यांनी केली.

**होल्ड - मुख्यमंत्री. (१२ सेकंद)**

**<><><><><>**

वस्तू आणि सेवा कराच्या संदर्भात २०१७ ते २०२० या ३ आर्थिक वर्षातला व्याज किंवा दंड किंवा दोन्ही माफ करण्यासाठीची अभय योजना राज्य सरकारनं लागू केली आहे. ३१ मार्च २०२५ ही कराच्या रकमेचा भरणा करण्याची अंतिम तारीख आहे. त्यापूर्वी देय रकमेचा भरणा केल्यास त्यावरचं सर्व व्याज आणि दंड माफ होणार असल्याने संबंधित व्यापाऱ्यांनी या अभय योजनेचा लाभ घ्यावा, असं आवाहन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज विधानसभेत केलं. राज्य प्राधिकरणाच्या अखत्यारीतल्या करदात्यांकडून साधारण एक लाख चौदा हजार अर्ज अपेक्षित आहेत. विवादित रक्कम ५४ हजार कोटी रुपयांची आहे. त्यापैकी विवादीत कर २७ हजार कोटी रुपयांचा आणि दंड आणि शास्तीची रक्कम २७ हजार कोटी रुपयांची आहे. यातले सुमारे साडे ५ ते ६ हजार कोटी रुपये तिजोरीत जमा होतील, अशी सरकारला आशा आहे.

विधानसभेत आज विद्यापीठ सुधारणा विधेयकही मंजूर झालं. यात एक अनुदानित महाविद्यालय आणि इतर दोन महाविद्यालयं एकत्र करुन क्लस्टर विद्यापीठ स्थापन करण्याची तरतूद आहे. यासाठी जागेच्या अटीची तरतूद मुंबई ठाण्यात शिथिल केली आहे.

वस्तू आणि सेवा कायद्यात दुरुस्ती, मुद्रांक शुल्कात वाढ प्रस्तावित करणारं विधेयकंही आज आवाजी मतदानानं विधानसभेत मंजूर झालं.

**<><><><><>**

राज्यपालांच्या अभिभाषणात महायुती सरकारच्या कामकाजाबाबत अनेक मोठे दावे करण्यात आले, पण राज्याची आर्थिक स्थिती पाहता ते फोल ठरण्याची शक्यता आहे, अशी टीका काँग्रेसचे आमदार विजय वडेट्टीवार यांनी आज विधानसभेत केली. राज्यपालांच्या अभिभाषणावरच्या चर्चेचा आज शेवटचा दिवस होता, यावेळी चर्चेत सहभागी होताना, महायुतीनं निवडणूक जाहीरनाम्यात दिलेली आश्वासन पूर्ण करण्याची मागणी वडेट्टीवार यांनी केली….

**होल्ड - बाईट - विजय वडेट्टीवार (१४ सेकंद)**

**<><><><><>**

राज्य विधान परिषदेच्या सभापती पदासाठी महायुतीच्या वतीनं राम शिंदे यांनी आज उमेदवारी अर्ज दाखल केला. दुपारी १२ वाजेपर्यंत अन्य उमेदवाराचा अर्ज दाखल झाला नसल्यानं शिंदे यांच्या बिनविरोध निवडीचा मार्ग मोकळा झाला आहे.

**<><><><><>**

परभणीतल्या पुतळा विटंबना, हिंसाचार, आंदोलन आणि बीड जिल्ह्यातल्या हत्येबाबत विरोधी सदस्यांनी उपस्थित केलेल्या मुद्दयावर आज विधानसभेत चर्चा सुरु झाली. काँग्रेसच्या नितीन राऊत यांनी चर्चेला सुरुवात केली. परभणीतल्या घटनेनंतर पोलिसांनी दलित वस्तीत घुसून अमानुष मारहाण केली. हे गंभीर आहे, अशा अधिकाऱ्यांवर कारवाई कधी करणार असा सवाल त्यांनी केला.

शांतता प्रस्थापित करण्यासाठी प्रयत्न करणाऱ्यांवरही गुन्हे दाखल केले, त्याच्या धक्क्यानं विजयकुमार वाकोडे यांचं निधन झालं. सोमनाथ सूर्यवंशीचा कोठडीत मृत्यू झाला. त्याच्या कुटुंबियांना पन्नास लाख रुपयांची मदत आणि सरकारी नोकरी द्यावी, अशी मागणी राऊत यांनी केली. या सगळ्या प्रकरणाची

चौकशी विशेष तपास पथक नेमून अथवा सी आय डी मार्फत करावी, अशी मागणीही त्यांनी केली.

**<><><><><>**

परभणी शहरात हिंसाचारा दरम्यान व्यापाऱ्यांचं मोठ्या प्रमाणात नुकसान झालं, त्यांना कोणत्याही FIR ची सक्ती न करता पंचनामे करून नुकसान भरपाई द्यावी, तसंच या प्रकरणात ज्यांच्या विरोधात जनाक्रोश आणि नागरिकांच्या तक्रारी आहेत अशा तीन पोलीस अधिकाऱ्यांना तात्काळ सक्तीच्या रजेवर पाठवावं, असे आदेश राज्य अनुसूचित जाती जमाती आयोगाचे उपाध्यक्ष धर्मपाल मेश्राम यांनी दिले आहेत. परभणी जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित वार्ताहर परिषदेत त्यांनी ही माहिती दिली.

**<><><><><>**

एसटी प्रवास भाड्यात साडेचौदा टक्के वाढ प्रस्तावित असल्याचं एसटी महामंडळाचे अध्यक्ष भरत गोगावले यांनी आज सांगितलं. ते नागपुरात वार्ताहर परिषदेत बोलत होते. एसटी कर्मचाऱ्यांच्या वेतनाचाही प्रश्न आहे. या सगळ्याचा आर्थिक बोजा पेलता यावा, यासाठी भाडेवाढ करावी लागणार आहे, असं त्यांनी सांगितलं. येत्या वर्षभरात सुमारे साडे ३ हजार बस खरेदी केली जाणार आहे. शक्यतो भंगार किंवा जुनाट बसगाड्या काढून टाकून नवीन गाड्या खरेदी करण्याकडे राज्य परिवहन महामंडळाचा कल आहे. सुमारे १ हजार ३०० नवीन गाड्या भाडेतत्त्वावर घेण्याचा निर्णय महामंडळानं घेतला आहे. बसस्थानकाची सुधारणा बीओटी तत्त्वावर केली जाणार आहे, असं ते म्हणाले.

**<><><><><>**

ज्येष्ठ साहित्यिक समीक्षक सुधीर रसाळ यांना साहित्य अकादमीचा पुरस्कार जाहीर झाला आहे. 'विंदांचे गद्य रूप' या पुस्तकासाठी रसाळ यांना हा पुरस्कार

मिळाला आहे. एक लाख रुपये रोख, ताम्रपट, आणि शाल या स्वरुपाचा हा पुरस्कार येत्या ८ मार्चला दिल्लीत समारंभपूर्वक प्रदान करण्यात येईल.

पुरस्काराबद्दल रसाळ यांनी आकाशवाणीशी बोलताना आनंद व्यक्त केला….

**बाईट- सुधीर रसाळ (२० सेकंद)**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सुधीर रसाळ यांचं अभिनंदन केलं आहे.

साहित्य अकादमी ने २१ भाषांमधल्या यंदाच्या पुरस्कार विजेत्यांची नावं आज जाहीर केली. त्यात ८ कवितासंग्रह, ३ कादंबऱ्या, २ लघुकथा, ३ ललितलेख, ३ साहित्य समीक्षा, एक नाटक आणि एका संशोधनात्मक साहित्यकृतींचा समावेश आहे. आकाशवाणी पणजी केंद्रातले सेवानिवृत्त वृत्तनिवेदक मुकेश थळीं यांच्या ‘रंगतरंग’ या कोकणी ललितलेख संग्रहालाही पुरस्कार जाहीर झाला आहे.

**<><><><><>**

गेटवे ऑफ इंडियावरून एलिफंटाला निघालेल्या बोटीला उरण जवळ झालेल्या अपघातात अंदाजे ७ ते ८ जण मृत्युमुखी पडल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज विधानसभेत दिली. नौदल किंवा तटरक्षक दलाची बोट बहुदा चालकाचं नियंत्रण सुटल्यानं अतिशय वेगानं प्रवासी बोटीला धडकल्याचं व्हिडिओत दिसत असल्याचंही त्यांनी नमूद केलं. मदत वेळेवर पोहोचल्यानं बहुतेकांना वाचवण्यात यश आल्याचं सांगून अपघातात प्राण गमावलेल्या आणि जखमी झालेल्यांना शासनातर्फे योग्य मदत देण्याचं आश्वासनही फडणवीस यांनी दिलं.

दरम्यान, बृहन्मुंबई महानगरपालिकेनं दिलेल्या माहितीनुसार या बोटीत एकंदर ८५ प्रवासी आणि कर्मचारी होते. यापैकी एका प्रवाशाचा मृत्यू झाला आहे, तर ५ जणांची प्रकृती गंभीर आहे. अपघातातल्या जखमींवर विविध रुग्णालयांमध्ये उपचार सुरू आहेत. तर उर्वरित पाच जणांचा शोध अद्याप सुरू आहे.

**<><><><><>**

विदर्भात काही ठिकाणी, तर कोकण मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी किमान तापमानात किंचित घट झाली. राज्यात सर्वात कमी किमान तापमान वाशीम इथं सहा पूर्णांक सहा दशांश अंश सेल्सिअस इतकं नोंदवलं गेलं.

येत्या दोन दिवसात, विदर्भात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता पुणे वेधशाळेनं व्यक्त केली आहे. या काळात राज्यात इतरत्र हवामान कोरडं राहील.

**//<><><><><>//**